20 MAR 2026
लोकमत

# आण्णासाहेब लठ्ठे लोकशिक्षक : मेणसे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शाहू कार्याशी बांधीलकी आणि गांधी विचारांशी निष्ठा अशा मुशीतून घडलेले दिवाणबहादूर आण्णासाहेब लठ्ठे हे लोकशिक्षक होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य आनंद मेणसे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे राजर्षी शाहू लोकविद्या आणि लोकसंस्कृती अभ्यास केंद्र, मराठी आणि इतिहास विभागाने आयोजित केलेल्या स्व. दिवाणबहाद्दूर आण्णासाहेब लठ्ठे स्मृती व्याख्यानमालेत 'आण्णासाहेब लठ्ठे : जीवन आणि कार्य' या विषयावर ते बोलत होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी होते.

यावेळी सांगलीच्या लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे सचिव सुहास पाटील प्रमुख उपस्थित होते. मेणसे यांनी प्रोफेसर लठ्ठे यांनी कोल्हापूरसह बेळगाव परिसरात केलेल्या विविधांगी कार्याची सविस्तर माहिती दिली. यावेळी डॉ. शिंदे, सुहास पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. अशोक चौसाळकर, सुरेश शिपूरकर, डॉ. अनिल गवळी, डॉ. शरद गायकवाड, डॉ. रफिक सूरज, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 MAR 2026

जनप्रवास

# भूगोल, ड्रोन तंत्रज्ञानात नवनवीन संधी

## शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा उत्साहात : रोजगार व संशोधनाच्या संधींबाबत महत्त्वपूर्ण माहिती

**जनप्रवास : कागल**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील भूगोल अधिविभाग आणि डी. आर. माने महाविद्यालय, कागल येथील भूगोल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ०६ मार्च २०२६ रोजी "भूगोल व भौगोलिक माहिती प्रणाली क्षेत्रातील आधुनिक करिअर संधी" तसेच "भौगोलिक माहिती प्रणालीतील ड्रोन तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाची सुरुवात उद्घाटन सत्राने झाली. प्रा. (डॉ.) अदिनाथ गाडे यांनी प्रास्ताविक करत कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट केला



व उपस्थित मान्यवरांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. (डॉ.) नंदकुमार कदम उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी आधुनिक काळात भूगोल विषयाचे वाढते महत्त्व अधोरेखित करत GIS आणि ड्रोनसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी निर्माण होत असलेल्या करिअर संधींचा लाभ घ्यावा, असे मार्गदर्शन केले.

प्रथम सत्रात डॉ. प्रशांत पाटील यांनी भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) या क्षेत्रातील आधुनिक करिअर संधींचे सविस्तर विवेचन केले. त्यांनी GIS चा शहरी नियोजन, आपत्ती व्यवस्थापन, शेती, पर्यावरण व्यवस्थापन, वाहतूक नियोजन आदी विविध क्षेत्रांतील उपयोग स्पष्ट करत विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील रोजगार व संशोधनाच्या संधींबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली.

द्वितीय सत्रात डॉ. अभिजित पाटील यांनी ड्रोन तंत्रज्ञानाची सविस्तर माहिती देत त्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर केले. ड्रोनच्या सहाय्याने भौगोलिक माहिती कशाप्रकारे संकलित केली जाते, त्याचे नकाशांकन व विश्लेषण कसे केले जाते याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवले. या सत्रामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक भौगोलिक तंत्रज्ञानाची प्रभावी व व्यावहारिक ओळख झाली.

या कार्यशाळा प्रसंगी प्रा. विनायक माळी जाधव, प्रा. कुलदीप मेटे, प्रा. संदीप वाडीकर, प्रा. संध्या सावंत, प्रा. पार्वती शिंगे, प्रा. अरुण कुंभार तसेच इतर प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सरस्वती गायकवाड यांनी केले.

सदर कार्यक्रमासाठी संस्थेचे सेक्रेटरी प्रताप उर्फ भैय्यासाहेब माने व कॅम्पस डायरेक्टर डॉ. प्रवीण चौगले यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. रेश्मा निडूणी यांनी उपस्थित मान्यवर, मार्गदर्शक व सहभागी यांचे आभार मानले. ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त, प्रेरणादायी व ज्ञानवर्धक ठरली.

20 MAR 2026
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात हॉस्टेल डे उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थिनी वसतिगृहात हॉस्टेल डे साजरा झाला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते. कुलसचिव डॉ. शिंदे, उपकुलसचिव प्रिया देशमुख यांनी मार्गदर्शन केले. हॉस्टेल डेनिमित्त फुगडी, गायन, एकांकिका आदी १९ सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. याचा बक्षीस वितरण सोहळा झाला. स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. कविता वड्राळे यांनी अहवाल वाचन केले. डॉ. मीना पोतदार यांनी आभार मानले. डॉ. नीलांबरी जगताप, वॉर्डन, कर्मचारी, विद्यार्थिनी उपस्थित होत्या.



कोल्हापूर : हॉस्टेल डे कार्यक्रमात नृत्य सादर करताना विद्यार्थिनी.

2 0 MAR 2026

जनप्रवास

# विद्यार्थिनी वसतिगृहात हॉस्टेल डे उत्साहात

**जनप्रवास : कोल्हापूर**

विद्यार्थिनींमध्ये वाचनाची संस्कृती रुजणे आवश्यक आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी वसतिगृहाच्या हॉस्टेल डे कार्यक्रमात ते बोलत होते.शिवाजी विद्यापीठात हॉस्टेल डे साजरा करण्यात आला.

या निमित्ताने घेतलेल्या स्पर्धांचा बक्षीस वितरण सोहळा रविवारी पार पडला. यावेळी उपकुलसचिव प्रिया देशमुख यांनी मनोगत मांडले. हॉस्टेल डे निमित्त फुगडी, गायन, एकांकिका इत्यादी वेगवेगळ्या १९ सांस्कृतिक स्पर्धा झाल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 MAR 2026 पुढारी

# निसर्गाच्या शाळेनं जे मला शिकवलं तेच लोकांना सांगते

## राहीबाई पोपेरे; शिवाजी विद्यापीठात दिला पर्यावरण वाचविण्याचा संदेश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मी कोणत्याही शाळेत शिकले नाही, पण निसर्गाच्या शाळेनं मला जगण्याचं खरं शिक्षण दिलं, तेच मी लोकांना सांगत असते, असे प्रांजळपणानं सांगत बीजमाता 'पद्मश्री' राहीबाई पोपेरे यांनी आयुष्यभराच्या कार्याचे इंगित उलगडले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित पद्माराजे स्मृती व्याख्यानमालेत त्यांनी मानवी जीवन, शेती आणि पर्यावरण यांच्यातील अतूट नात्याची मांडणी केली. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, पर्यावरणशास्त्र अधिविभाग, यशवंतराव चव्हाण सेंटर फॉर रुरल डेव्हलपमेंट व समाजशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पोपेरे यांचे 'देशी बियांचे संवर्धन आणि स्त्रियांची भूमिका' या विषयावर विशेष



व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या.

त्या म्हणाल्या, निसर्गच खरा गुरू आहे. माती चांगली असेल, तर अन्न चांगले येते, अन्न चांगले असेल तर माणूस निरोगी राहतो आणि पुढची पिढी सुदृढ घडते. रासायनिक शेतीमुळे वाढणारे आजार, बदलती जीवनशैली आणि पारंपरिक अन्नधान्यापासून दूर जाण्याचे दुष्परिणाम स्वतःच्या आयुष्यात भोगले. त्यामुळेच देशी वाणांकडे वळले.

राहीबाईंनी पारंपरिक बियाण्यांचे जतन, सेंद्रिय शेती आणि 'किचन गार्डन' या संकल्पनांवर विशेष भर दिला. प्रत्येक घरात, प्रत्येक शेतात आणि अगदी शाळांच्या परिसरातही भाजीपाला पिकवण्याचे आवाहन त्यांनी केले.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी राहीबाई पोपेरे यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. आसावरी जाधव यांनी परिचय करून दिला. ऊर्मिला दशवंत यांनी सूत्रसंचालन केले. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले. यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, निसर्गमित्र अनिल चौगुले, डॉ. नितीन माळी, प्रिया देशमुख आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 MAR 2026 पुण्यनगरी

# 'स्वयंसिद्धा'मधून महिलांचे सामाजिक नेतृत्व घडेल

## डॉ. प्रशांत नारनवरे; शिवाजी विद्यापीठात ऑनलाईन कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्वयंसिद्धा उपक्रमाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण होऊन सक्षम सामाजिक नेतृत्व निर्माण होईल, असा विश्वास महाराष्ट्राच्या राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी येथे व्यक्त केला. शिवाजी विद्यापीठामध्ये बेटी बचाओ अभियान, विद्यार्थी विकास विभाग आणि स्वयंसिद्धा सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्वयंसिद्धा, स्त्रीशक्ती पोर्टल आणि आदिशक्ती' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय कार्यशाळेत प्रमुख वक्ते म्हणून ऑनलाईन मार्गदर्शन करताना ते बोलत होते. विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या.

डॉ. नारनवरे म्हणाले, महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, रोजगार आणि सक्षमीकरण ही त्रिसूत्री अत्यंत महत्त्वाची आहे. या त्रिसूत्रीच्या आधारावर महिलांना सक्षम करून त्यांच्यातून नेतृत्व विकसित करण्याची गरज आहे.

लोकभवनचे अवर सचिव (शिक्षण) विकास कुलकर्णी यांनीही ऑनलाईन संवाद साधला. ते म्हणाले, स्वयंसिद्धा व स्त्रीशक्ती पोर्टल हे महिलांसाठी महत्त्वाचे डिजिटल व्यासपीठ असून, यावर जास्तीत जास्त नोंदणी करून सक्रिय सहभाग आवश्यक आहे.

एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या स्वयंसिद्धा नोडल ऑफिसर डॉ. अनुराधा पोतदार म्हणाल्या, स्वयंसिद्धाच्या माध्यमातून शहरी, ग्रामीण, तसेच आदिवासी भागातील प्रत्येक महिलेला जोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. या पोर्टलवर नोंदणी करून महिलांना शिक्षण, प्रशिक्षण आणि विविध उपक्रमांमध्ये सहभागी होता येते. याचा महिलांनी लाभ घ्यावा.

अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, आज राज्यात स्वयंसिद्धा पोर्टलवर नोंदणी करण्यात शिवाजी विद्यापीठ अग्रेसर आहे; पण हे अग्रेसरत्व नोंदणीपुरते मर्यादित न राहता महिलांविषयक प्रश्न, अनुभव, समस्या निवारण आदींविषयक चर्चेचे सर्वंकष व्यासपीठ म्हणून पुढे येणे अभिप्रेत आहे.

बेटी बचाओ अभियानाच्या डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. उज्ज्वला बिर्जे, सुप्रिया वडर यांनी सूत्रसंचालन केले, तर आकाश ब्राह्मणे यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

2 0 MAR 2026

लोकमत

# निसर्गाच्या शाळेनं शिकवलं; तेच सांगितलं : राहीबाई पोपेरे

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** मी कोणत्याही शाळेत शिकले नाही; पण निसर्गाच्या शाळेनं मला जगण्याचं खरं शिक्षण दिलं, तेच मी लोकांना सांगितलं, असे प्रतिपादन बीजमाता 'पद्मश्री' राहीबाई पोपेरे यांनी अत्यंत प्रांजळपणानं केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित केलेल्या पद्माराजे स्मृती व्याख्यानमालेत त्यांनी माती, निसर्ग, जंगल आणि रानभाज्या जपण्याचे आवाहन केले.

शिवाजी विद्यापीठाचे कै. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, पर्यावरणशास्त्र अधिविभाग, यशवंतराव चव्हाण सेंटर फॉर रूरल डेव्हलपमेंट आणि समाजशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पोपेरे यांचे 'देशी बियांचे संवर्धन आणि स्त्रियांची भूमिका' या विषयावर विशेष व्याख्यान मंगळवारी झाले.

प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या. व्याख्यानाला कोल्हापूरसह जिल्ह्यातील शेतकरी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

राहीबाई यांनी कमी खा; पण शुद्ध, सात्विक खा, असा संदेश दिला. जंगलातील वणवे रोखण्याचे आवाहन करणारी आणि रानमेव्याचे महत्त्व सांगणारी दोन गाणीही त्यांनी म्हटली. यावेळी त्यांनी शंकांचे समाधानही केले. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी घालून उद्घाटन करण्यात आले. डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. आसावरी जाधव यांनी परिचय करून दिला. उर्मिला दशवंत यांनी सूत्रसंचालन केले. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सुहासिनी पाटील, निसर्गमित्र अनिल चौगुले, डॉ. नितीन माळी, प्रिया देशमुख उपस्थित होते.

20 MAR 2026 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात हॉस्टेल डे साजरा



**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात विद्यार्थिनी वसतिगृहाच्यावतीने हॉस्टेल डे साजरा करण्यात आला. यावेळी स्पर्धा परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

विद्यार्थिनींमध्ये वाचनाची संस्कृती रुजवणे आवश्यक आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी व्यक्त केले. हॉस्टेल डेच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या स्पर्धांचा बक्षीस वितरण सोहळा पार पडला. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी, विद्यार्थिनींना आयुष्यात ध्येय ठरवून ते साध्य करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले यांचे विचारमूल्य डोळ्यांसमोर ठेवून विद्यार्थिनींनी आपले भविष्य घडवावे, असे मत व्यक्त केले. यावेळी उपकुलसचिव प्रिया देशमुख यांनी विद्यार्थिनींना स्पर्धा परीक्षेत अपयश आले, तरी चांगली मेहनत करून संकटावर मात करावी आणि आयुष्य घडवावे असे आवाहन केले.

हॉस्टेल डे निमित्त फुगडी, गायन, एकांकिका इत्यादी वेगवेगळ्या १९ सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी स्वागत केले. डॉ. कविता वड्राळे यांनी अहवाल वाचन केले. विद्यार्थिनींनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. मीना पोतदार यांनी आभार मानले. यावेळी डॉ. नीलांबरी जगताप उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 MAR 2026
तरुण भारत

# महिलांना रोजगार उपलब्ध करू : डॉ. नारनवरे

प्रतिनिधी
कोल्हापूर

महिलांना अधिकाअधिक रोजगार उपलब्ध करून देऊ. त्यांना विविध क्षेत्रात सहभागी करून त्याचे सक्षमीकरण करू, असे प्रतिपादन राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात स्वयंसिद्धा सेंटरच्या वतीने स्त्रीशक्ती पोर्टल आणि आदिशक्ती यावरील कार्यशाळेत ते ऑनलाईन बोलत होते. यावेळी विद्यापीठाच्या प्रभारी प्र.कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. नारनवरे म्हणाले, स्वयंसिद्धा प्लॅटफॉर्म द्वारे महिलांना अनेक संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. महिलांनी त्याचा वापर करून कर्तृत्व सिद्ध करावे. स्वयंसिद्धा प्लॅटफॉर्मवर तुम्ही ऑनलाइन व्यवसाय सुरू करू शकता. आत्मनिर्भर, शैक्षणिक व रोजगार या तिन्ही क्षेत्रात महिलांसाठी भरीव कामगिरी करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, महिलांच्या सबलीकरणासाठी स्वयंसिद्धा पोर्टल हे महत्त्वाचे आहे. अलीकडे महिला सबलीकरणात विधायक वाढ झाली आहे. महिला दिन विचारांची देवाणघेवाण करणारा दिवस आहे. शिक्षा, स्वातंत्र्य, स्वावलंबन, सामाजिक न्याय, समता हे महिलांच्या आयुष्यातील महत्त्वाचे घटक आहेत. शिक्षित महिलांनी दुसऱ्या अशिक्षित महिलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे गरजेचे आहे, असे सांगितले.

अनुराधा पोतदार, विकास कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. प्रतिमा देसाई यांनी स्वागत करून आभार मानले.